स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवशास्त्र विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयाच्या पी.एच.डी (विद्यावाचस्पती) पदवीकरीता सादर करावयाचा प्रबंध आराखडा

”महिलांच्या आर्थिक संक्षमीकरणाच्या निवडक योजनांचा चिकीत्सक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा (2012–2022)”

संशोधक विद्यार्थीनी :– प्रतिमा कमलाकर बोरोळकर

संशोधन मार्गदर्शक :– प्रा.डॉ.सी.जे.देशमुख
अर्थशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर.

संशोधन केंद्र :– अर्थशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर – 413517 ता.उदगीर जि.लातूर

दिनांक :– 01/09/2023

महिलांच्या आर्थिक सक्षमिकरणाच्या निवडक योजनांचा चिकीत्सक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा (2012 ते 2022)

प्रस्तावना :–

स्त्री ही निर्मात्याची शक्ती मानली जाते ही मानव जातीच्या अस्तित्वासाठी स्त्री जबाबदार आहे. या निर्मीतीच्या शक्तीचा विकास तसेच सामाजिक आर्थिक आणि राजकीय न्याय, मत स्वातंत्र, श्रद्धा आणि उपासना स्वातंत्र आणि संधीची समानता ही महिला संक्षमिकरणाची व्याख्या केली जाते. महिलांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे जेणे करुन त्यांना रोजगार शिक्षण आणि आर्थिक प्रगती तसेच सामाजिक स्वातंत्र आणि प्रगतीच्या समान संधी मिळतील. पुरुषाप्रमाणेच महिलांना त्यांचे ध्येय साध्य करण्याचा हा एकमेव मार्ग आहे. सोप्या भाषेत महिला सक्षमीकरणाची व्याख्या महिलांना त्यांच्या जीवनाबद्दल स्वतःचे निर्णय घेण्याची आणि त्यांच्या कुटूंबात आणि समाजात आनंदाने जगण्याची शक्ती देण्याची प्रक्रीया म्हणून केली जावू शकते. महिला सक्षमीकरण म्हणजे समाजात त्यांचे खरे हक्क बाजावण्याची त्यांची क्षमता.

महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने भारत सरकारचे अनेक कार्यक्रम आहेत. यापैकी बरेच कार्यक्रम रोजगार, शेती आणि आरोग्य या सारख्या समस्यांशी संबंधीत आहेत. हे कार्यक्रम भारतीय महिलांना भारतीय महिलांच्या गरजा लक्षात घेवून तयार करण्यात आले आहे. जेणे करुन त्यांचा समाजातील सहभाग सुधारावा सद्याच्या काळातील स्त्रिया काळ बदलला म्हणून वाचायला आणि लिहायला मोकळ्या आहेत. देशासाठी आवश्यक काम करण्यास सक्षम आहेत. आपल्या देशाच्या लोकसंख्येपैकी जवळपास निम्मी महीला आहेत. म्हणून राष्ट्र उभारणीचे उदिष्टे तेव्हाच पुर्ण होवू शकते जेव्हा राष्ट निर्मीतीच्या महान श्रमातील महिलांची भुमिका आणि योगदान योग्य रितीने ओळखले गेले आणि त्याचे मोल केले गेले. महिलांच्या संक्षमिकरणासाठी सद्या देशात सर्वच क्षेत्रात प्रयत्न सुरु आहेत. याचा परिणामही बगता येईल. देशातील महिलांना आता परिस्थितीची जाणीव झाली आहे. आजच्या स्त्रीने आपले मन बदलले आहे. तिला विश्वास आहे की, ती घर आणि कुटूंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी अधिक सक्षम आहे.

वेगाने बदलनाऱ्या आजच्या आधुनिक युगात महिला सशक्तीकरण किंवा महिला ससक्षमीकरण हा महत्वाचा मुद्दा आहे. एखादा व्यक्ती सक्षम असने याचा

अर्थ आहे की, तो स्वतःचे निर्णय स्वतः घेवू शकतो. आणि कोणाच्याही सहाय्याशिवाय जीवन जगू शकतो. आजच्या काळात महिला सक्षमिकरण हा चर्चेचा विषय बनला आहे. कारण आज प्रत्येकाला कळून चुकले आहे की, देशातील स्त्रियांच्या प्रगतीशिवाय देशाची प्रगती शक्य नाही. अशा पद्धतीने स्त्रियांना मान देण्यात आला आहे. स्त्रि मानव जातीचे अस्तित्व आहे. तिच्यामुळेच सृष्टी निर्माण झाली आहे. म्हणून स्त्रिला पुरुषाप्रमाणेच अधिकार दिले पाहिजे. इत्याची गोष्टीची पुर्तता केल्यास एक स्त्रि सक्षम आणि सशक्त होईल. आपले निर्णय स्वतः घेण्यास ती पुर्णपणे तयार झालेली असेल. आज भारत शासनाद्वारे महिलांच्या सशक्तीकरणासाठी अनेक योजणा राबविल्या जात आहेत. महिला व बालविकास कल्याण मंत्रालय भारत सरकार द्वारे महिलांना सशक्तीकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री जणधन योजना, बेटी बचाव, बेटी पढाव योजना, महिला हेल्पलाईन योजना, उज्वला योजना इत्यादी काही प्रमुख महिला सशक्तीकरण योजना भारत सरकार द्वारे राबविण्यात येत आहे.

आज भारताची जलद होणारी आर्थिक प्रगती पाहता असे लक्षात येते की, येत्या काही वर्षामध्ये भारत महिला सक्षमिकरणाचे ध्येय साध्य करु शकेल परंतु लवकरात लवकर संपुर्ण देशातील महिलांना सशक्त करण्याकरीता योग्य निर्णय आणि उपक्रम राबविने आवश्यक आहे. शासनाने व देशातील जनतेने महिला ससक्ष्मीकरणाची आवश्यकता समजुन घ्यायला हवी. व या विषयी जास्तीत जास्त लोकांना ते जागृती निर्माण करायला हवी. जर या सर्व गोष्टी पार पडल्या तर येत्या काही वर्षातच भारतातील महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करताना दिसतील.

संशोधनाचे महत्व :—

प्रस्तूत संशोधन महिलांच्या आर्थिक सक्षमिकरणात निवडक योजनांचा एक चिकीत्सक अभ्यास या संदर्भात आहे. कोणत्याही देशाच्या प्रगतीसाठी महिला सक्षम असले नितांत गरजेचे असते प्रस्तुत संशोधनातून महिला सक्षमिकरण म्हणजे काय यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. त्यामुळे महिला सक्षमिकरणाची संकल्पना समजुन घेण्यास जनसामान्यांना मदत होईल. त्याचप्रमाणे या संशोधनातून भारत व महाराष्ट्रातून, केंद्र व राज्य पातळीवरुन महिला सक्षमिकरणाची झालेल्या प्रयत्नांची व त्यांच्या परिणामाची माहिती मिळण्यास मदत होईल. तसेच महिला सक्षमिकरणात येणाऱ्या अडचणी समजण्यास

मदत होईल. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विद्यार्थी, शिक्षक, समाज, शासन, संशोधक यांना उपयुक्त ठरु शकेल.

भारत शासनाद्वारे महिलांच्या सक्षमिकरणासाठी व सबलीकरणासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. महिला व बालविकास कल्याण मंत्रालय भारत सरकार द्वारे महिला सक्षमिकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. सुकन्या समृद्धी योजना, पी.एम.जनधन योजना अशा काही निवडक योजना भारत सरकार द्वारे राबविण्यात येत आहेत. महिला सक्षमिकरणासाठी असलेल्या या धोरणांचा व विविध योजनांचा लाभ महिलांना मिळाला तर त्या खऱ्या अर्थाने सक्षम होतील. अर्थात सर्व क्षेत्रात महिलांना समान संधी व समान स्थान मिळविण्याकरीता महिलांसाठी केलेल्या सर्व कायदेशीर तरतुदीची आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी काटेकोरपने करणे गरजेचे आहे. तेव्हाच महिलांना समाजाचा एक परिपुर्ण घटक म्हणून समान स्थान मिळेल. आणि खऱ्या अर्थाने महिला सक्षमिकरण होण्यास मदत होईल. महिला सक्षमिकरणामुळे महिलांच्या जीवनात अनेक बदल झाले आहेत. महिलांनी प्रत्येक कामात सक्रीय भाग घेणे सुरु केले आहे. महिला स्वतःचे निर्णय स्वतः घेवू लागले आहेत. महिला हळुहळू स्वावलंबी होवू लागले आहेत. पुरुषही आता स्त्रियांना समजून घेत आहेत. त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी पुरुष आता महिलांच्या निर्णयाचा आदर करत आहेत.

समस्या आणि स्वरुप :

भारतीय राज्य घटनेच्या कलम 14 नूसार सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान आहेत. कलम 15 नूसार जात, धर्म, लिंग इत्यादीच्या आधारे नागरिकांत मतभेद केला जाणार नाही. तर कलम 16 नूसार शैक्षणिक पात्रता असणाऱ्या स्त्रि आणि पुरुषास शासनात कोणतेही पद प्राप्त करता येईल. या हक्कामुळे स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात वावरताना दिसतात. महिलांना राजकारणात सहभाग घेण्याचा मतादान करण्याचा आणि निवडणुकीला उभे राहून निवडणुक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. आधुनिक समाजातील संस्कृती ही पुरुषप्रधानही नाही व स्त्रिप्रधानही नाही, तर ती अर्थप्रधान आहे. म्हणून महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी राजकीय व प्रशासकिय सहभागासाठी त्यांना आर्थिक स्वावलंबी होणे गरजेचे आहे. असे झाल्यास कोणताही अधिकारी किंवा नेता असलेल्या महिलांच्या निर्णयावर पुरुष आपले वर्चस्व गाजवु शकणार नाही.

आजही ग्रामीण भागातील महिलांचे जीवन अनेक समस्येने ग्रस्त आहे. जसे मुलींच्या जन्माचे स्वागत नाही. मुलगा हाच वंशाचा दिवा, शिक्षणाचा अभाव,

अंधश्रृद्धा, आरोग्याचा प्रश्न, आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव, महिलांवर चारित्र संशय इत्यादी प्रश्नांना आजही भारतीय समाजातील महिलांना सामोरे जावे लागते आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयात महिला सक्षमिकरण म्हणजे काय ? महिला सक्षमिकरणाचे उद्देश तसेच महिलांना सक्षम बनविण्यासाठी राबविलेल्या सरकारच्या निवडक योजनेचा अभ्यास या संशोधन आराखड्यात करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :–

1. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. महिला सक्षमिकरणात सुकन्या समृद्धी योजना व प्रधानमंत्री जनधन योजना यांची लातूर जिल्हातील स्रि़त्रयांच्या सक्षमिकरणातील भुमिका.
3. महिला सक्षमिकरणसाठी उपाय योजना सुचविणे.
4. महिला सक्षमिकरण योजनेचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहित कृत्ये :–

1. महिला सक्षमिकरणात सुकन्या समृद्धी योजना व पी.एम.जनधन योजनांची भूमिका महत्वाची ठरली आहे.
2. महिलांचा आर्थिक दर्जा दुय्यम आहे.
3. महिला सक्षमिकरणाच्या विविध योजना व कार्यक्रमाची माहिती महिलांपर्यंत पोहचत आहे.
4. महिला सक्षमिकरणात शासनाच्या योजना प्रभावी ठरत आहेत.

संशोधनाची अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा :–

प्रस्तुत संशाधन विषय महिला सक्षमिकरणात सरकारच्या निवडक योजनांचा अभ्यास करुन महिलांची आर्थिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. हा विषय लातूर जिल्हा पुरता मर्यादित असून, महिला सक्षमिकरणाचे कार्यपद्धतीचा अभाव निवडक योजनेचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यामध्ये सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री जनधन योजना इत्यादींचा आढावा घेण्यात येणार असून सदरील संशोधन हे 2012 ते 2022 या कालावधीतील निवडक योजनांचा अभ्यासापुरता मर्यादित राहील.

भौगोलिक क्षेत्र :– (लातूर जिल्हा)

लातूर जिल्हा महाराष्ट्राच्या मराठवाड्यामधील छत्रपती संभाजीनगर विभागातील एक जिल्हा आहे. लातूर हे जिल्हा मुख्यालय व महाराष्ट्र राज्यातील सोळावे मोठे नगर आहे. जिल्हा प्रामुख्याने कृषीप्रधान आहे.

क्षेत्र :–

7157 कि.मी.

तालुके :–

अहमदपूर, उदगीर, औसा, चाकूर, जळकोट, देवणी, निलंगा, रेणापूर, लातूर तालूका, शिरुर अनंतपाळ.

कालावधी :– (2012 ते 2022)

संशोधन पद्धती :–

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्कम संशोधन आराखड्याचा उपयोग केला आहे. विविध सामाजिक शास्त्रात सामामाजिक घटकांचा आणि वास्तव परिस्थीतीचा अभ्यास करावयाचा असेल तर त्याकरीता संशोधन आराखड्याचे कार्य अत्यंत महत्वपुर्ण मानले जाते. संशोधन आराखड्याशिवाय सत्य घटनांचा अभ्यास होवू शकत नाही. म्हणून सामाजिक संशोधनात संशोधन आराखड्याचा उपयोग साधन म्हणून केला जातो. वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करुन त्या समुहाच्या स्थितीचे व वैशिष्ट्यांचे वर्णन करता येते. त्यामुळे हा आराखडा उपयुक्त ठरतो.

सैधांतिक आधार :–

अर्थशास्त्रातील स्त्रि अभ्यास या शाखेशी संबंधीत असून त्यामधील महिला सक्षमिकरण या मुलभूत संकल्पनेचा आधार घेवून ते संशोधन कार्य पुर्ण केले जाईल.

नमुना निवड :–

लातूर जिल्हयातील वेगवेगळ्या दहा तालूक्यापैकी निवडक योजनेचा लाभ घेतलेल्या तालुक्याचे अध्ययनासाठी निवड करण्यात येईल व दहा तालुक्यातून प्रत्येकी पाच गावाची अशा एकूण दहा गावाची निवड करण्यात येईल. या प्रत्येक गावातून महिला सक्षमिकरण करण्यासाठी शासनाच्या निवड योजनेचा लाभ

घेणाऱ्या महिलांना लॉटरी पद्धतीने पाच महिलांची निवड करुन अशा एकून 250 उत्तर दात्यांची निवड करण्यात येईल. ही निवड यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करता यईल.

तथ्य संकलनाचे स्त्रोत :–

प्रस्तुत संशोधन अध्ययणासाठी पुढील प्रमुख तथ्य संकलन स्त्रोताचा वापर करुन वस्तुनिष्ठ माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.

1. प्राथमिक स्त्रोत

प्रस्तुत संशोधन शोध अध्ययनासाठी उपयुक्त असलेली वास्तव माहिती मिळविण्यासाठी लातूर जिल्हयातील दहा तालुक्यातून प्रत्येकी एक तालूक्यातील पाच गावातील पाच लाभ धारक महिलांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांच्याकडून मुलाखत अनूसुची तंत्राचा वापर करुन योग्य ती महत्वपुर्ण महिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याचबरोबर निरीक्षण तंत्राचा वापर करुन उपयुक्त महितीचे संकलन करण्यात येईल.

2. दुय्यम स्त्रोत

प्रस्तुत शोध कार्याचे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी आवश्यक ती संपुर्ण माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित अशा दुय्यम प्रकारच्या स्त्रोताचा उपयोग करण्यात येणार आहे. संशोधन विषयासी संबंधीत महितीचे संकलक करण्यासाठी वेगवेगळ्या ग्रंथालयांना व प्रकाशकांना भेटी देवून या विषयासी साम्य असणाऱ्या विषयाचे अध्ययन करण्याच्या सव संस्थाशी संपर्क करुन माहिति प्राप्त करण्याचा प्रयत्न असेल. प्रस्तुत विषयासी निगडीत वर्तमान प्रत्रातील लेख, मासिके, साप्ताहिक, संदर्भ ग्रंथे, इंटरनेट सेवा इत्यादींचा वापर करुन वस्तुनिष्ठ महिती मिळविण्याचा प्रयत्न करुन त्याआधारे महितीचे विश्लेशन व निष्कर्श काढण्यात येतील.

3. तथ्य विश्लेषण :–

प्रस्तुत संशोधनाचे अध्ययण करण्यासाठी ज्या माहितीचे संकलन केले जाईल त्या माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी की (Key) आणि सांकेतीकरण (Coding) करण्यात येईल. त्यानंतर सांकेतिय महितीचे तक्ते बनवुन, माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात येईल तसेच काही तक्तेही दुय्यम क्षेत्राच्या आधारे संकलीत करुन त्या माहितीचे व्यवस्थीत विश्लेषण व अर्थ निर्वाचन करुन निष्कर्ष काढण्यात येतील.

4. संशोधन अहवालाची मांडणी :–

प्रस्तुत संशोधन अहवालाची प्रकरण रचना पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण रचना
प्रकरण – पहिले
प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना करीत असताना विषयाची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली. तसेच संशोधन विषयाची सफलता रुपरेषा स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्यानंतर महिला संक्षमिकरणाचा अर्थ, उद्देश, स्वरुप व व्याप्ती इत्यादीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण – दूसरे
संशोधन साहित्याचा आढवा

पुर्व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच विद्यापीठात प्रकाशित व अप्रकाशित विषयासंबंधी संशोधनाचा वापर केलेला आहे. तसेच वर्तमानपत्रातील लेख, संदर्भ ग्रंथ इत्यादीची माहिती घेतली आहे.

प्रकरण – तिसरे
लातूर जिल्याची ओळख

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाच्या विषयाची व्याप्ती लातूर जिल्हा असल्यामुळे त्या लातूर जिल्हाची आर्थिक घडामोडींचा आढावा घेताना लातूर जिल्हा विकासाचा अभ्यास करण्यात आला. यात जिल्हयातील भुमी, हवामान, नैसर्गिक साधन संपत्ती, दळन–वळन, सेवा क्षेत्र, औद्योगिकरण इत्यादी घटकांचा विकासात्मक वर्णन करण्यात आले आहे.

प्रकरण – चौथे
लातूर जिल्हयातील निवडक योजनांचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात सुकन्या समृद्धी योजना व जनधन योजना या दोन योजनेचे प्राथमिक तथ्य संकलन करुन त्यावर आधारित माहितीचे सविस्तर विश्लेषण केले जाईल.

प्रकरण – पाचवे
महिला सक्षमिकरणासाठी शासकिय योजनेचे अध्ययन

प्रस्तुत प्रकरणात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या राबविल्या जाणाऱ्या सुकन्या समृद्धी योजना व पी.एम.जनधन योजना या दोन योजनेचा कार्यक्रम कशाप्रकारे यशस्वी झाला आहे. याचे सविस्तर वर्णन या प्रकरणात करण्यात आले आहे.

प्रकरण – सहावे
निष्कर्ष व शिफारशी

प्रबंधाच्या या अंतिम प्रकरणात वरील पाच प्रकरणाच्या आधारे लातूर जिल्हातील महिला सक्षमिकरणाची स्थिती व आर्थिक स्थिती तसेच शासनाच्या निवडक योजनेचे योगदान व परिणाम यांचे निष्कर्ष काढने तसेच महिलांच्या सक्षमिकरणासाठी प्रत्येक क्षेत्रात सहभाग वाढवुन व्यवस्थापन करणे.

संदर्भ सुची :–

1. स्त्रि प्रश्नाची चर्चा – रानडे प्रतिभा, पॉप्यूलर प्रकाशन, मूंबई (1991)
2. महिला सशक्तीकरण का सच – मिनाक्षी निशांत सिंह, ओमेगा पब्लीकेशन, नई दिल्ली.
3. सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली – डॉ.विजय एल जरारे, आद्वेद प्रकाशन, कानपुर (2013)
4. महिला व बालकल्याण – डॉ.एस.टी.सीरसाट, चिन्मय प्रकाशन, संभाजीनगर (2001)

5. भारतातील सामाजिक समस्या – पी.के.कुलकर्णी विद्या प्रकाशन, नागपूर (1998)
6. सामाजिक संशोधन पद्धती – डॉ.पु.ल.भांडारकर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ, नागपूर (1987)
7. मानवाधिकार और महिला एँ राजवालासिंह, अविष्कार पब्लीकेशन, जयपूर (1995)
8. मासिके –

1) योजना – सप्टे.2020　2) कुरुक्षेत्र – मार्च 2022

3) समाजकल्याण – जुन 2021 4) लोकराज्य – जाने 2023

संशोधन मार्गदर्शक　　**संशोधक विद्यार्थीनी**

प्रतिमा कमलाकर बोरोळकर
शिवाजी महाविद्यालय, उदगीर

डॉ.सी.जे.देशमुख
अर्थशास्त्र विभाग, उदगीर